महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.**
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

महत्वाचे परिपत्रक :- जा. क्र. : तंशिविकापु/शै.वि-३/२०२५-२६/गुणवत्ता यादी पडताळणी/ 3717
दिनांक : ०९/१०/२०२५ ९ ऑक्टोबर २०२५

**प्रति,**
प्राचार्य / संचालक,
शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित
सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी/व्यवस्थापनशास्त्र/
अभ्यासक्रमाच्या संस्था,पुणे विभाग

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया..**
**संदर्भ :- महाराष्ट्र राज्य विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २००५ दि.१७.०८.२०१५**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया पुर्ण झालेली आहे. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) च्या तरतुदीनुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित संस्था, खाजगी विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची तपासणी करण्याकरीता सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना प्राधिकृत केले आहे.

या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या जिल्हांमधील संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील पदवी व पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी, व्यवस्थापनशास्त्र, अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मुळ कागदपत्राची पडताळणीचे संबंधित जिल्हयातील शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थामध्ये दि.१३.१०.२०२५ ते ३१.१०.२०२५ पर्यंत करावयाचे आहे.

सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, तपासणी केंद्राने निर्धारीत केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे प्रवेश प्रक्रियेसंदर्भात काम करणारे अधिकारी/कर्मचाऱ्यांनी आवश्यक कागदपत्रासह उपस्थित रहावे. **(तपासणी केंद्राचे व तपासणीचे वेळापत्रक स्वंतत्ररित्या कळविण्यात येईल)** सदर तपासणीसाठी उमेदवारांची सर्व आवश्यक मुळ कागदपत्रांसोबत Receipt cum Acknowledgment of confirmation of Admission (Institute Reporting) ची प्रत घेऊन जावे. तसेच प्रवेश यादी पडताळणीसाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावरील संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांची यादींची प्रत १ प्रतीत (प्राचार्याचे नाव/स्वाक्षरी शिक्क्यासह) घेऊन जावे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळाव्यतिरिक्त अन्य यादी (उदाहरणार्थ MS Word File etc.) पडताळणीसाठी स्विकारली जाणार नाही. तपासणी अधिकारी यांच्याकडून सोबत जोडण्यात आलेला तपासणी अहवाल भरुन घेण्यात यावा.

कृ.मा.प.

तरी सर्व संस्थांनी त्यांना नेमून दिलेल्या तपासणी केंद्रांकडून आपली प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी व त्यांची मुळ कागदपत्रे तपासून घेतल्यानंतर या विभागीय कार्यालयाकडुन पुढील पडताळणी व तपासणी प्रमाणपत्र प्राप्त करणेकरीता वेगळे वेळापत्रक या कार्यालयाकडुन संकेतस्थळावर प्रदर्शित करणेत येईल. पडताळणी केलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे सादर करणेसाठी संस्थेने वर निर्धारित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या सुचनेनूसार प्रवेश याद्या ऑनलाईनरित्या सादर करणे सुध्दा आवश्यक आहे. त्याबदल वेळोवेळी आपणांस अवगत करण्यात येईल.

महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतुदी तसेच वेळोवेळी पारीत झालेले प्रवेश नियम/शासन निर्णय/अधिसुचना/न्यायालयीन आदेश व विहीत केलेल्या नियमांनुसार प्रवेश पडताळणी अहवाल या कार्यालयास विहीत कालमर्यादेत सादर झाल्याशिवाय शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची अंतिम मान्यता प्रदान होणार नाही व त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्था जबाबदार राहील.

( डॉ.द.व्यं.जाधव )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

# गुणवत्ता यादी पडताळणी अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील (प्रथम/व्दित्तीय पदवी व पदव्युत्तर पदवी) अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्याच्या गुणवत्ता यादी पडताळणी अहवाल

संस्थेचे नाव :-

समन्वयक अधिकाऱ्याचे नाव व मोबाईल नंबर :-

| अ.क्र. | संस्था कोड | संस्थेचे नाव व पत्ता | एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | त्रुटींची संख्या (नसल्यास निरंक टाकावे) | त्रुटींचे स्वरुप (शाखा यादी मधील अनुक्रमांक व त्रुटी) | यादी तपासणी अधिकाऱ्याचं नाव,पदनाम,भ्रम्नध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

तपासणी अधिकारी स्वाक्षरी (दिनांकासह) व शिक्का